# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१
E-mail : desk19@dtemaharashtra.gov.in Web : www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १९/तंशिसं/क्वॉ.से/२०१९/१२
दिनांक : 21 JAN 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य,
सर्व शासकीय पदवी व पदविका संस्था

विषय : NBA मुल्यांकनाबाबतचा ॲक्शन प्लॅन सादर करणेबाबत...

संदर्भ : १) संचालनालयाचे पत्र क्र. १९/तंशिसं/क्वालिटी सेल/एनबीए/२०१७/८२, दिनांक १६ डिसेंबर, २०१७
२) संचालनालयाचे पत्र क्र. १०/एनजीपी/पीसीआय ॲप्रुव्हल/२०१७/४२७७, दिनांक २० डिसेंबर, २०१७
३) संचालनालयाचे पत्र क्र. १६/आस्था/आढावा बैठक/२०१८/२२६, दिनांक १०-१२-२०१८

उपरोक्त विषयाच्या संदर्भात सिडनहॅम कॉलेज, मुंबई येथे दिनांक १३ डिसेंबर, २०१८ रोजी आयोजित केलेल्या आढावा बैठकीच्यावेळी मा. सचिव श्री. सौरभ विजय तसेच मंत्रालयातील अधिकाऱ्यांसमोर आपण आपल्या संस्थेच्या कामगिरीबाबत केलेल्या सादरीकरणाच्या अनुषंगाने मा. सचिवांनी आपल्या संस्थेत सुरु असलेले अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मान्यता दिलेले विविध अभ्यासक्रमांचे एनबीए मुल्यांकन करुन घेण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्यामानकानुसार नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेशक्षमता वाढ इ. साठी संस्थेतील अभ्यासक्रमांचे NBA मुल्यांकन असणे अनिवार्य आहे.

राज्यातील तंत्र शिक्षणाबाबत गुणात्मक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने सर्व संस्थांचे NBA मुल्यांकन असणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्या संस्थेतील किती अभ्यासक्रमांना NBA प्राप्त झालेले आहे व किती अभ्यासक्रम NBA Pre Qualify होऊ शकतात याबाबतची माहिती वेळोवेळी शासनास सादर करावयाची असते. सदर माहिती ही सतत बदलत असल्याने (Dynamic) तंत्र शिक्षण संचालनालयाच्या क्वॉलिटी सेलने अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मदतीने NBA Status Portal तयार करुन घेतले आहे. जेणेकरुन संस्थांची NBA बाबतची माहिती त्वरीत उमलब्ध होईल. सदरचे पोर्टल संचालनालयाच्या वेबसाईटवर http://nba.dtemaharashtra.gov.in येथे उपलब्ध करुन देण्यांत आलेले आहे.

त्या अनुषंगाने आपल्या संस्थेत एनबीएच्या मार्गदर्शक तत्वानुसार आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा, विद्यार्थी-अध्यापक गुणोत्तर (SFR), प्रयोगशाळा तसेच इतर मानके इत्यादी बाबी असणे आवश्यक आहे. आपण आपल्या संस्थेत असलेल्या पायाभूत सुविधांबाबतची माहिती दोन आठवड्यांच्या आंत सदरच्या पोर्टलवर भरावी. आपल्या संस्थेत एका एनबीए-को-ऑर्डिनेटरची नियुक्ती करुन त्यास एनबीए पोर्टलवरील माहिती भरण्याचे काम सुपूर्द करावे तसेच आपण नियुक्त केलेल्या एनबीए-को-ऑर्डिनेटरचे नांव, त्यांचा इ-मेल आयडी व फोन नंबर याबाबतची माहिती संचालनालयास कळविण्यांत यावी.

तरी, आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या संस्थेचे एनबीए मुल्यांकन करुन घेण्याच्या दृष्टीने एक ॲक्शन प्लॅन तयार करुन आपल्या विभागीय कार्यालयाच्या मदतीने त्यानुसार कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा. मुंबई

388 23/1/19

प्रत: सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर त्यांना कळविण्यांत येते की, आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील संस्थांमधील सदर कामाचा आढावा घेऊन संबंधित संस्थेस त्यांचे एनबीए मुल्यांकन करण्याच्या कामी आवश्यक ते सहकार्य करावे.

D:\Desk-19\Mali\General-Letter-2018.doc

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/२०१९/364
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 04 FEB 2019

१)प्राचार्य, सर्व शासकीय पदवी व पदवीका संस्था अमरावती विभाग अमरावती यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

सहसंचालक तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, अमरावती.